# विवरणपत्र -1

**१३ वने ७% वन महसूल अनुदान अंतर्गत सन २०२५ -२६ प्रस्ताव**

| | | |
|---|---|---|
| 1 | **योजनेचे नाव** | **जिल्हयातील शेतकरी उत्पादक कंपनी /शेतकरी गट /महिला बचत गट यांना किसान ड्रोन खरेदीसाठी अनुदान देणे.** |
| 2 | **योजनेचे स्वरूप** | गडचिरोली जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनी /शेतकरी गट /महिला बचत गट यांना किसान ड्रोन खरेदीसाठी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम ५ लक्ष किवा 65 % ( जे कमी असेल ते ) अनुदान मर्यादेत देणे . |
| 3 | **योजनेचे लाभार्थी** | शेतकरी उत्पादक कंपनी /शेतकरी गट /महिला बचत गट |
| 4 | **उद्देश** | 1) शेतकरी उत्पादक कंपनी /शेतकरी गट /महिला बचत गट यांचे सक्षमीकरण करणे व बळकटीकरण करणे.<br>2) सुधारित कार्यक्षमता, वाढीव पीक उत्पादन यासाठी कृषि क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञानाचा प्रचारे करणे .<br>3) वेळेची व पाण्याची बचत करणे .<br>4) ग्रामीण रोजगार निर्मिती करणे व आर्थिक समावेशाच्या संधी वाढवणे.<br>5) Nano खाते वापरण्यास प्रोसहान देणे आणि खते व कीटक नाशकाचा वापर इष्टतम करणे . |
| 5 | **कार्यान्वयीन यंत्रणा** | कृषि विकास अधिकारी , जिल्हा परिषद गडचिरोली |
| 6 | **अटी/ शर्ती / आवश्यक कागदपत्रे** | **1)लाभार्थी गटास पायलट परवाना मिळण्यासाठी DGCA द्वारे निर्देशित केलेल्या संस्थे कडून(RPTO) किंवा कोणत्याही अधिकृत पायलट संस्थेकडून प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे .**<br><br>**2)पूर्व संमती प्राप्त होताच 1 महिन्याच्या आत दिलेल्या विनिर्देशानुसार ड्रोने खरेदी करुन देयक कार्यालयास सादर करणे. जिल्हा स्तरावरून संबंधित लाभार्थी गटाच्या बँक खात्यात थेट डी बी टी द्वारे RTGS/NEFT द्वारे जमा करण्यात येतील. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावरच अनुदान देय राहील.**<br><br>**3) गटासाठी नोंदणी प्रमाणपत्र तसेच शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीकृत असणे आवश्यक**<br><br>**4)गटातील सदस्यांचे आधार कार्ड , भ्रमणध्वनी क्रमांक .** |

| | | |
|---|---|---|
| | | ५) गटाचे आधार संलग्न बँक खाते .<br>6)गटाची सदस्य यादी / शेतकरी उत्पादक कंपनी सदस्य यादी<br>7)RPTO प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित व्यक्तीचा तपशील.<br>8)उद्यम आधार प्रमाणपत्र |
| 7 | **अनुदानासाठी पात्र ड्रोन** | **ड्रोन चे Nano, Micro, Small, Medium व Big असे प्रकार असले तरी कृषि क्षेत्रात वापराकरिता केवळ Small व Medium या दोन प्रकारच्या ड्रोन साठी अनुदान देय राहील.** |
| 8 | **कार्य पद्धती** | 1) सदर ड्रोन साठी अर्ज जिल्हा परिषद कृषि विभाग कडे सादर करावा .<br>2) प्रथम येणार्यास प्रथम प्राधान्य नुसार निवड केली जाईल. उपलब्ध लक्षांकाच्या अधीन राहून प्राप्त अर्जातून लाभार्थी गट निवड करण्यात येईल.<br>3) संबंधिताना निवड झाल्या नंतर पत्राद्वारे कळविले जाईल, त्यानुसार पुढील 10 दिवसात पूर्व संमती मिळवणे करीता आपला सविस्तर प्रस्ताव उपरोक्त कागद पत्रासह कार्यलायास सादर करावा.<br>4 ) प्राप्त लक्षांका पेक्षा जास्त अर्ज आल्यास प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल व जे लाभार्थी गट विहित वेळेत प्रशिक्षण व ड्रोन खरेदी करणार नाहीत त्यांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादी तील पुढील लाभार्थी निवड करण्यात येईल.<br>5) आलेल्या प्रस्तावाची छाननी करुन अनुदानास पात्र लाभार्थी गट तसेच मान्यता प्राप्त यादीतील ड्रोन असल्याची खात्री झाल्यास पूर्व संमती देण्यात येईल.<br>**सदर पूर्व संमती गटांना खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून देण्यात येईल.**<br>1) पूर्व संमती पत्रात नमूद केलेलाच ड्रोन खरेदी करणे अनिवार्य राहील. याशिवाय वेगळा ड्रोन खरेदी केल्यास अनुदान देय राहणार नाही.<br>2) RPTO ट्रेनिंग पूर्ण करणे व तसे प्रमाण पत्र सादर केल्या नंतरच अनुदान वर्ग केले जाईल.<br>3) ड्रोन खरेदी करताना गटाच्या/कंपनीच्या बँक खात्यातून इलेक्ट्रॉनिक/धनादेश /धनाकर्ष द्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे आवश्यक राहील.<br>**उपरोक्त नुसार खरेदी करुन खरेदीची पावती कार्यालयास 10 कार्यालयीन दिवसात अनुदान अदायगीसाठी सादर करावी.**<br>**ड्रोन खरेदी नंतर तपासणी साठी संयुक्त तपासणी समिती ची नेमणूक केली जाईल .** |

| | | |
|---|---|---|
| 9 | सहपत्र | 1. सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या DIGISKY पोर्टल वर नमूद केलेल्या ड्रोन साठी Type Certificate प्राप्त आहे अश्या कंपनी ची यादी .<br>2. Details of technical specification of some drone companies.<br>3. Drone द्वारे फवारणी करताना घेण्याची दक्षता - सूचना |
| 10 | टीप | वन अनुदानातून घेतलेली कामे / योजना वन क्षेत्रातील गावात राबविणे बंधनकारक राहील . |

कृषि विकास अधिकारी ,
जिल्हा परिषद गडचिरोली

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद गडचिरोली

# अर्ज नमुना

**योजनेचे नांव : जिल्हयातील शेतकरी उत्पादक कंपनी /शेतकरी गट /महिला बचत गट यांना किसान ड्रोन खरेदीसाठी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम 5 लक्ष किंवा ६५ % (जे कमी असेल ते) अनुदान मर्यादेत देणे.**

1) गटाचे / शेतकरी उत्पादक कंपनी चे नाव: ........................................................

2) गटाचे/ शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक ..................................

3) गावाचे नाव : .......................................

4) तालुका :..................................................

5) अध्यक्ष /सचिव /सदस्यांचे आधार कार्ड नंबर ................................................

6) गटाचे स्वतंत्र व आधार संलग्न बँक खाते आहे का ? होय/नाही

7) उद्यम आधार प्रमाणपत्र नंबर .................................................

8) बँक खाते क्रमांक : ...........................................................................................

9) गटातील/ शेतकरी उत्पादक कंपनी मधील ..........................................................व्यक्ती RPTO प्रशिक्षण पूर्ण करू इच्छितो .

गट/ शेतकरी उत्पादक कंपनी अध्यक्ष नाव ...................

मोबईल नंबर..........................................................

सही....................................................................

# ड्रोनद्वारे फवारणी करताना घ्यावयाची दक्षता

## अ) फवारणी पूर्व :-

1)ड्रोन निषिध्द क्षेत्रात (विमानतळ किंवा Electronic Station) ड्रोन उडडाण न करण्याची दक्षता घ्यावी. ग्रीन झोनमध्ये मानव रहीत विमान प्रणाली (ड्रोन) operate करण्यासाठी कोणत्याही पूर्व परवानगीची आवश्यकता नाही.

2) फवारणीसाठी वापरण्यात येणारा ड्रोन "No Permission-No Takeoff" व "Hardware/Firmware सह Digital Sky अनुरुप असावा.

3) ड्रोनद्वारे नियंत्रित अवकाशात (Airspace) काम करण्यासाठी DGCA कडून Unique Identification Number (UIN) मिळवणे व तो ड्रोनवर चिकटविणे आवश्यक राहील.

4) ड्रोनद्वारे फवारणी करण्यासाठी ड्रोन चालकाकडे DGCA कडून मानव रहित विमान Operator परवाना घेतलेला असावा.

5) ड्रोन उडवताना होणा-या बाहय हस्तक्षेपावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. होणारा हस्तक्षेप हा mobile Device किंवा सिंग्नल ला येणारा अडथळा या स्वरुपाचा देखील असू शकतो.

6) ड्रोन चालकाने ड्रोन उडविणे आणि कीटक नाशकाचा सुरक्षित वापर याबाबत प्रशिक्षण घेतलेले असावे.

7) ड्रोनद्वारे फवारणी करण्यापूर्वी ड्रोन चालकाने 8 तासाच्या आत कोणत्या प्रकारच्या अल्कोहोल युक्त पेयाचे सेवन केलेले नसावे.

8) फवारणी करण्यापूर्वी Nozzle Output आणि कीटकनाशकाच्या Labelled मात्रेचा अचूक वापर सुनिश्चित करण्यासाठी ड्रोन Spray System Caliberate केलेली असावी.

9) फवारणी पूर्वी फवारणी करावयाचे क्षेत्र व फवारणी न करावयाचे क्षेत्र (DGCA/CIB/RCद्वारे निश्चित केल्याप्रमाणे) यामध्ये Buffer Zone सेट करावा.

10) फवारणी करावयाच्या क्षेत्राच्या जवळपासच्या जलस्त्रोत बाबत खात्री करावी. जल श्रोत प्रदुषित होउु नये म्हणून जल स्त्रोताच्या जवळ (फवारणी क्षेत्रापासून 100 मीटर पेक्षा कमी अंतरावर) कीटक नाशकाची फवारणी करू नये.

11) ड्रोनद्वारे फवारणी करताना अनुचित घटना अथवा अपघात घडून आल्यास या बाबत तातडीने स्थानिक प्रशासनाला अवगत करावे.

12) अधिक्रुत परवानगीशिवाय लोकांच्या समुहावर, सार्वजनिक ठिकाणी अथवा लोकांनी भरलेल्या Stadium वर किसान ड्रोन उडविण्यात येउु नये.

13) सरकारी सुविधा/आस्थापने/लष्करी तळ किंवा नो- ड्रोन झोन क्षेत्रात ड्रोन उडवू नये.

## ब) फवारणी कालावधीत घ्यावयाची दक्षता :-

1) कीटक नाशक संदर्भात सुरक्षा मार्गदर्शन संमजून घेण्यासाठी कीटकनाशक lable काळजीपूर्वक वाचावे.

2) फवारणी सुरु करण्यापूर्वी वैक्तिक संरक्षण उपकरणे परिधान करावे, त्या नंतरच फवारणी कामास प्रारंभ करावा.

3) ड्रोन चालकाने फवारणी करत असताना कोणत्याहि प्रकारचे अन्न पदार्थ खाणे, पाणी पिणे व धुम्रपान करणे टाळावे.

4) फवारणी करतेवेळी ड्रोनचे वळण कमी करण्यासाठी उडडाणचा मार्ग वाजवी आहे.याची ड्रोन चालकाने खात्री करून मार्ग सुनिश्चितता करावी.

5) कीटकनाशक फवारणी करण्यापूर्वी आवश्यकता भासल्यास कमीत कमी 5मिनीटे फवारणी (operation) ची चाचणी घेण्यासाठी प्रथम शुध्द पाण्याने फवारणी करावी. (जिथे शक्य असेल आणि आवश्यक असेल तिथे.)

6) फवारणी साठी योग्य प्रकारचे वापरण्यात येणारे कीटकनाशक व त्याचे प्रमाण ठरविण्यासाठी विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीचा सल्ला घेण्यात यावा.

7) फवारणी करण्यापूर्वी खालील बाबीसाठी हवामान स्थिती तपासावी वा-याचा योग्य वेग/ योग्य तापमान /योग्य आर्दता

8) फवारणी करावयाच्या पिकापेक्षा ड्रोन उडडाणाची उंची योग्य प्रकारे सुनिश्चित करणे, फवारणी साठी लागणा-या पाण्याचे योग्य प्रमाण व ड्रोनची योग्य उडाण गती सुनिश्चित करणे आवश्यक राहील, तसेच उपचारीत क्षेत्रामध्ये लगेच कोणत्या प्रकारचे शेती काम करणे टाळावे.

9) मधमाश्या चा-यासाठी येण्याच्या काळात फवारणी करु नये तसेच फुल पिकावर फवारणी करु नये. लक्ष्य नसलेल्या जीवांसाठी विषारी कीटक नाशकांची फवारणी करतांना उदा. मासे, पक्षी आणि रेशीम कीटक, उत्पादन lable आवश्यकता चे काटेकोर पालन करणे आणि जोखीम टाळण्यासाठी प्रभावी उपाय योजना करणे आवश्यक राहील.

**क) फवारणीनंतर घ्यावयाची दक्षता -**

1) फवारणी केलेल्या क्षेत्रातुन वेळेवर बाहेर पडणे व ताज्या हवेत स्थानांतरीत व्हावे, अंघोळ करुन स्वच्छ कपडे परिधान करावे.
2) फवारणी करुन उरलेला घटक कचरा जाळू अथवा जमिनीत पुरण्यात येऊ नये.
3) फवारणी केल्यानंतर किटकनाशकांचे रिकामे डब्बे शेतात टाकू नयेत या बाबत कीटकनाशक नियम 1971 नुसार त्याची विल्हेवाट लावावी.
4) फवारणी केलेल्या क्षेत्रज्ञत लोकांना आठवण करुन देण्यासाठी चेतावणी चिन्हे लावावीत.

**हवामान विषयक बाबी :-**

**1) वाऱ्याची दिशा आणि वेग :- अ )** जमीन पातळीपासून 1.5 ते 2.00 मीटर उंची वर 5 MPS पेक्षा जास्त वाऱ्याचा वेग असल्यास फवारणी करु नये.
**ब)**जमीन पातळीपासून 1.5 ते 2.00 मीटर उंची वर 3 MPL पेक्षा कमी वेग असल्यास फवारणी करण्यास हरकत नाही.
2)**तापमाण :-** फवारणीवेळी उच्च तापमान असताना ड्रोनद्वारे फवारणी करण्यात येऊ नये . फवारणी करताना शक्यतो सकाळी व दुपारी 4 वाजेनंतर करावी.
3)**पर्जन्यमान:-** फवारणी वेळी पाऊस चालु असताना ड्रोनद्वारे फवारणी करण्यात येऊ नये.
4)**आर्द्रता:-** फवारणीवेळी हवेत 50 टक्के पेक्षा कमी आर्द्रता असताना ड्रोनद्वारे फवारणी करण्यात येऊ नये.

**ड्रोनआधारित कीटकनाशक वापरासाठी विचारात घेतले जाणारे गंभीर मापदंड**

1)केवळ केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समितीने (CIB & RC) मान्यता दिलेली किटकनाशके ड्रोनद्वारे फवारणीसाठी वापरण्यात यावीत. अन्य कीटनाशकांचा वापर ड्रोनद्वारे फवारणीसाठी करण्यात येऊ नये.
2) ड्रोनद्वारे फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांच्या मात्रा या केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समितीने (CIB & RC) मान्यता दिलेल्या मर्यादेत राखणे आवश्यक राहील.
3) ज्या कीटकनाशकांना सदर बाब लागू असेल अश्या कीटकनाशके पातळ करण्यासाठी केवळ स्वच्छ पाण्याचा किंवा केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समितीने (CIB & RC) द्वारे मंजुर केलेल्या अन्य योग्य घटकाचा वापर करावा.

**कीटकनाशके वापराबाबत :-** केंद्र शासणाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागाच्या पिक संरक्षण विभाग द्वारे दिनांक 18 एप्रिल 2022 रोजी ड्रोन द्वारे फवारणीसाठी कीटकनाशके व इतर मूलद्रव्ये यांची यादी देण्यात आली आहे. त्या प्रमाणे व त्यात नमूद सुचना प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील.

## सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या DIGISKY पोर्टल वर नमूद केलेल्या ड्रोन साठी Type Certificate प्राप्त आहे अश्या कंपनी ची यादी

| अ.क्र | ड्रोन उत्पादक कंपनीचे नाव | क्लास | UAS मॉडेल | All up Weight (kg) | Max Height attainable (Ft) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | IOTECH WORLD AVIGATION PVT LTD | SMALL | AGRIBOT | 24.9 | 98.43 |
| 2 | GARUDA AEROSPACE PVT LTD | SMALL | GA-AD | 24.56 | 49.21 |
| 3 | CBAI TECHNOLOGIES PVT LTD | SMALL | MODEL V | 5.43 | 400 |
| 4 | MARUT DRONETECH PVT LTD | MEDIUM | AG-365 | 29.45 | 328 |
| 5 | DHAKSHA UNMANNED SYSTEM PVT LTD | MEDIUM | DH-AG-H1 | 47.6 | 49.21 |
| 6 | GENERAL AERONOTICS PVT LTD | MEDIUM | Krishak | 49.1 | 98.4 |